

## विशेष ग्रंथ पुरस्कार

मनोगत

**चंद्रकांत वानखडे**

'आपुला चि वाद आपणासी' हे एका कार्यकर्त्याचे आत्मकथन आहे. १९७० ते २००० या कालखंडातील आयुष्याचा लेखाजोखा या पुस्तकात आला आहे. १९७२ मध्ये नागपूर येथे जयप्रकाश नारायण यांनी स्थापन केलेल्या तरुण शांतिसेनेच्या शिबिरात हा मुलगा दाखल होतो आणि त्याच्या आयुष्याला वेगळे वळण लागते. आणीबाणीच्या काळात एस.एम.जोशी यांच्यासोबत काम करणे, छात्रयुवा संघर्ष वाहिनीचा महाराष्ट्र संयोजक म्हणून काम करणे, मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर आंदोलनात सहभागी होणे, आणि नंतर यवतमाळ जिल्ह्यातील मेटीखेडा येथे जाऊन शेतकऱ्यांमध्ये काम करणे असा हा प्रवास आहे. 'मेटीखेडा' या दोन हजार लोकवस्तीच्या गावातील अनेक पातळ्यांवरचा संघर्ष हा या पुस्तकाचा गाभा आहे. किमान गरजा भागत नसताना आपल्या भोवतीच्या पिडलेल्या, नाडलेल्या लोकांचे प्रश्न सोडवत असताना अनेक पातळ्यांवरच्या शत्रुत्वाशी सामना करणे, मूल्यांवर निष्ठा ठेवून सत्तेच्या आणि संपत्तीच्या मोहापासून दूर राहणे, या संदर्भातील अनेक घटनाप्रसंगांतून हे आत्मकथन उलगडत गेले आहे. समाजाशी संघर्ष करत असताना हा कार्यकर्ता आत्मसंघर्षालाही सामोरा जातो म्हणजेच आपुला चि वाद आपणासी....

# युद्धस्य कथा रम्या: असेच तर होत नाही ना?

**कार्यकर्ता म्हणून जे काही पाहिले, अनुभवले, भोगले ते बहुतांश 'जगणं' या पुस्तकात लिहिले आहे. माझ्या जगण्याला ज्या प्रमाणात मिळाले त्याच्या कितीतरी अधिक प्रमाणात माझ्या 'लिहिण्यास' मिळाले. मान, सन्मान, कौतुक, नाव, प्रसिद्धी पुरस्कार. त्यामुळे माझ्यातील 'कार्यकर्ता' चंद्रकांत वानखडेला 'लेखक' चंद्रकांत वानखेडेचा हेवाही वाटतो आहे. त्यामुळे माझ्यातील कार्यकर्त्याला काही प्रश्नही पडले आहेत. युद्धापेक्षा 'युद्धस्य कथा रम्या:' असाच काहीसा प्रकार घडत नाही ना? जगण्यापेक्षाही लिहिण्यालाच जास्त किंमत आहे का? एखादा कार्यकर्ता जगतो आहे. पण आपले जगणे त्याने लिहिले नाही किंवा लिहूच शकत नाही म्हणून समाज त्याची किंमत करणार नाही का? त्याची दखलच घेणार नाही का? असे होऊ नये, एवढीच नम्र विनंती.**

खरे तर १०-१२ वर्षांपूर्वी 'आपुलाचि वाद आपणासी' सारखे आत्मकथनपर पुस्तक मी लिहीन किंवा लिहू शकेन असे स्वप्नात देखील वाटणे शक्य नव्हते; किंवा तसे कोणी म्हटले असते तर त्यालाही मी त्याक्षणीच उडवून लावले असते. स्वत:विषयी फारसे बोलू नये किंवा लिहू तर नयेच, याविषयी मी ठाम होतो; पण अपघाताने २००० सालानंतर कार्यकर्ता चंद्रकांत वानखेडे पत्रकार बनला. 'कार्यकर्ता' म्हणून 'जगणे' महत्त्वाचे आणि 'लिहिणे' दुय्यम, हा क्रम पत्रकारितेने उलटून टाकला आणि आयुष्यात व्यावसायिकतेचा भाग म्हणून लिहिणे हा प्रमुख भाग बनला. 'नवराष्ट्र' या दैनिकात काम करताना माझे सहकारी मित्र श्याम माधव धोंड यांनी रविवारच्या पुरवणीसाठी नियमीतपणे एक सदर लिहावे, असा प्रस्ताव माझ्या समोर मांडला आणि एका गाफिल क्षणी मी त्याला होकारही भरला. त्याने सदराचे 'झाडाझडती' हे नावही निश्चित केले. पण विषय जेव्हा त्याने सांगितला तेव्हा मात्र मी दचकलो. 'या सदरात तुम्ही तुमच्याच जगण्याची, तुमच्याच सहवासात आलेल्या व्यक्ती, संघटना व ज्या चळवळींमध्ये तुम्ही सहभागी झालात त्या सर्वांची झाडाझडती तुम्ही घ्यायची आहे.' आधीच होकार भरलेला; त्यातही श्यामने नकारासाठी थोडीबहुतही जागा मला ठेवायची नाही असा चंग बांधलेला. 'आपुलाचि वाद आपणासी' या पुस्तकाच्या पायाभारणीस अशा प्रकारे सुरुवात झाली. या पुस्तकाचा 'पाया' श्याम माधव धोंड या माझ्या सहकारी मित्राने अशा प्रकारे रचला, हे जरी खरे असले तरीही त्यावर 'कळस' चढविला तो प्रथम माझा वाचक व नंतर मित्र बनलेल्या सुनिल यावलीकरने. ही कळस कथाही तेवढीच मनोरंजक आहे.

दोन-अडीच महिने 'झाडाझडती' नियमितपणे सुरू राहीली; पण परत एकदा, 'आपण स्वत:बद्दल का लिहायचे?'चा तीव्र झटका आला आणि मी लिहिणे थांबवले. वाचकांच्या पसंतीस उतरलेले सदर बंद झाल्यामुळे स्वाभाविकपणे वाचकांनी तक्रार केली. काही रुसले, रागावले, थोडेफार हळहळले. काही दिवस हा प्रकार चालला व नेहमीप्रमाणे थंडावला. पण एका चिवट वाचकाबाबत मात्र हे घडले नाही. तो म्हणजे सुनिल यावलीकर. मी अर्धवट सोडलेले लिखाण पूर्ण करावे यासाठी सातत्याने पाठपुरावा, न थकता, न कंटाळता तो करीत राहिला. 'छाताडावर बसणे', म्हणजे नेमके काय असते, याचा प्रत्यय 'आपुलाचि वाद आपणासी' लिहून पूर्ण होईपर्यंत सुनिलने मला दिला. आपल्या एकट्याला तगादा

पुरेसा पडणार नाही याची जाणीव होताच त्याने दुसराच 'कट' रचला. २००९ साली सुनिल यावलीकरने लिहिलेली 'अस्वस्थ वर्तमान' ही कादंबरी मनोविकास प्रकाशनाने प्रकाशित केली. या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा अमरावती येथे आयोजित केला होता. या प्रकाशन सोहळ्याचा मी अध्यक्ष होतो. स्वाभाविकपणे मनोविकास प्रकाशनचे सर्वेसर्वा अरविंद पाटकरही उपस्थित होते. प्रास्ताविक भाषणात 'अस्वस्थ वर्तमान' या पुस्तकावर बोलताना अरविंद पाटकरांनी जाहीरपणे घोषणा केली. 'चंद्रकांत वानखेडेंचे पुस्तकही आम्ही लवकरच प्रकाशित करीत आहोत.' या घोषणेने मला धक्काच बसला; कारण त्यावेळेपर्यंत माझे लिखाणही झाले नव्हते. या घोषणेचा व्हायचा तोच परिणाम झाला. आता सुनिल यावलीकर शिवाय अनेक मित्रांचे फोन सातत्याने येऊ लागले. झाले का लिहून? कधी होणार आहे? पुस्तक कधी प्रकाशित करणार? माझे लिखाण पूर्णत्वास नेण्यासाठी आपला दाब कमी पडतो की काय, म्हणून सुनिलने अशा प्रकारचा दबाव माझ्यावर वाढविला. 'आपुलाचि वाद आपणासी' हे पुस्तक लिहायला निमित्त मी असलो, तरी हे पूर्णत्वास न्यायला सुनिल यावलीकर कारणीभूत ठरला. त्याला मन:पूर्वक सलाम.

पुस्तकाचे हस्तलिखित वाचून त्यावर उपयुक्त सूचना सुप्रसिद्ध लेखिका कविता महाजन यांनी सुचविल्या. एवढेच नव्हे, तर पुस्तकाला 'नाव' ठेवण्याची जबाबदारीही मी त्यांच्यावरच सोपविली. ती त्यांनी आनंदाने पार पाडत 'आपुलाचि वाद आपणासी' या नावाने त्याचे 'बारसे'ही केले आणि मनोविकास प्रकाशनाच्या अरविंद पाटकर ह्यांनी प्रकाशित केले. अशी ही पुस्तकाची 'बाळंतकथा'. पुस्तकाची 'पायाभरणी' करणारा श्याम माधव धोंड. त्यावर 'कळस' चढविणारा सुनिल यावलीकर, या पुस्तकाचे 'बाळंतपण' करणारे मनोविकास प्रकाशनचे अरविंद पाटकर आणि पुस्तकाचे 'बारसे' करणारी कविता महाजन या सर्वांचे आभार मानण्याच्या फंदात न पडता त्यांच्या ऋणातच रहाणे माझ्यासाठी अधिक आनंददायी आहे.

२४ ऑक्टोबर २०१० ला 'आपुलाचि वाद आपणासी' या पुस्तकाचे नागपूरला प्रकाशन झाले आणि काही दिवसांतच वाचकांच्या प्रतिक्रियांचा ओघ अखंडपणे सुरू झाला. 'पुस्तक फारच छान, खूपच आवडले. एका बैठकीतच संपवले.' 'पुस्तक वाचताना त्यात चुंबकीय शक्ती असल्याचे जाणवले. ते सोडवतच नाही. चक्क धरूनच ठेवते, इ.इ.' त्यातच अमरावती जिल्ह्यातील एका वाचकाचा फोन आला. 'सर, तुम्ही मला ओळखत नाही पण तुमचे पुस्तक मी वाचले...' एवढे बोलल्यानंतर त्याचा गळा दाटून येतो आहे आणि त्याला पुढे काही बोलणे कठीण जात आहे याची जाणीव होत नाही, तोच त्याचा हुंदकाच कानावर आला. मीच त्याला म्हणालो, 'दहा-पंधरा मिनिटांनंतर मीच तुला पुन्हा फोन करतो', असं म्हणत मी मोबाईल बंद केला. दहा-पंधरा मिनिटांनंतर त्याला फोन केला. आता तो बराच निवळला असावा असे त्याच्या आवाजावरून वाटत होते. तो बोलण्याआधीच मी त्याला प्रश्न केला, 'एवढं दाटून येण्याइतपत काय झालं?' तो बोलू लागला, 'सर, तुम्ही पुस्तकात लिहिण्याप्रमाणेच जवळपास मीही जगलो. पण सर्वांनी मला वेड्यात काढलं. घरी-दारी सर्वांनी जेवढं टोचता येईल तेवढं टोचून काढलं. या सर्वांचा परिणाम म्हणून कालांतराने आपलंच काहीतरी चुकलं असेल असं म्हणत

**२४ ऑक्टोबर २०१० ला 'आपुला चि वाद आपणासी' या पुस्तकाचे नागपूरला प्रकाशन झाले आणि काही दिवसांतच वाचकांच्या प्रतिक्रियांचा ओघ अखंडपणे सुरू झाला. 'पुस्तक फारच छान, खूपच आवडले. एका बैठकीतच संपवले.' 'पुस्तक वाचताना त्यात चुंबकीय शक्ती असल्याचे जाणवले. ते सोडवतच नाही. चक्क धरूनच ठेवते, इ.इ.' त्यातच अमरावती जिल्ह्यातील एका वाचकाचा फोन आला. 'सर, तुम्ही मला ओळखत नाही पण तुमचे पुस्तक मी वाचले...' एवढे बोलल्यानंतर त्याचा गळा दाटून येतो आहे आणि त्याला पुढे काही बोलणे कठीण जात आहे याची जाणीव होत नाही, तोच त्याचा हुंदकाच कानावर आला.**

म्हणत मी संपूर्णत: स्वत:ला अपराधबोधामध्ये ढकलून दिलं. त्यातच मी कुढत होतो. पण तुमचं पुस्तक वाचलं आणि लख्ख प्रकाश पडला. आपलं तर काहीच चुकलं नव्हतं. आपण उगाचच स्वत:ला दोष लावत बसलो.'

तो थोडा वेळ थांबला, परत म्हणाला, 'तुमच्या पुस्तकाने माझा सर्व गुंताडा मोकळा केला. मी खरोखरच मोकळा झालो. आणि तुम्ही ते केलं याबद्दल तुम्हांला धन्यवाद'. आता परत त्याचा गळा दाटून यायला सुरुवात झाल्यासारखे वाटू लागले, म्हणून मी फोन बंद केला.

'आपुलाचि वाद आपणासी' या पुस्तकावर अशी काही प्रतिक्रिया येईल अशी मला अपेक्षा नव्हती; पण येणाऱ्या प्रतिक्रियेत 'माझा गुंताडा मोकळा झाला. पुस्तक वाचून मी डिप्रेशन मधून बाहेर आलो. 'तुमचं पुस्तक वाचून मी माझंच आत्मकथन वाचतो आहे, असं वाटलं. अशा प्रकारच्या प्रतिक्रियाही काही कमी नव्हत्या.

पुस्तक प्रकाशानानंतर त्यावर बरीच चर्चा झाली. जवळपास सर्वच वृत्तपत्रांमधून व नियतकालिकांमधून त्यावर समीक्षणे लिहून आली. ललित मासिकाच्या मुखपृष्ठावर ठळकपणे या पुस्तकाची दखल घेण्यात आली. अमरावती, यवतमाळ, बुलडाणा, लातूर, मुंबई, पुणे यांसारख्या शहरांमधून त्यावर चर्चासत्रे आयोजित केली गेली. त्यावर माझ्या अनेक ठिकाणी प्रकट मुलाखतीही घेण्यात आल्या. अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठात या पुस्तकावर चर्चासत्र आयोजित केले गेले. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे; विदर्भ साहित्य संघ, नागपूर; या साहित्यिक संस्थांनी पुस्तकाला पुरस्कार देऊन गौरविले. २०११ चा 'पद्मश्री विखे पाटील साहित्य पुरस्कार' आणि आता 'महाराष्ट्र फाऊंडेशनचा सामाजिक संदर्भ साहित्य विशेष पुरस्कार' 'आपुलाचि वाद आपणासी' या पुस्तकाला मिळाला आहे.

पुस्तकाला मिळणाऱ्या व अजूनही सर्वस्तरांतून त्याला मिळणाऱ्या प्रतिसादाने मी मात्र अचंबित आहे. माझा मलाच प्रश्न पडतो असे कां व्हावे? रिकामे पोते उभे राहत नाही, त्यात काहीतरी भरावे लागते. तसाच रिकामा शब्द उभा राहत नाही. तो शब्द जगण्यातूनच भरावा लागतो. मी थोडा बहुत जगलो. तेच जगणे शब्दांतून मांडण्याचा प्रयत्न केला, म्हणून पुस्तक उभे राहताना तर दिसत नाही ना? कळत नाही.

कोणाची निराशा दूर करणे; कोणाला प्रेरणा देणे, काही उपदेश करणे; कोणाला अपराधबोधातून मुक्ती देणे; या कारणांसाठी तर मी हे पुस्तक निश्चितपणे लिहिले नाही. पण परिणाम स्वरूप असे काही घडत असेल, तर त्याचा सहर्ष पण तेवढाच 'सावध' स्वीकार करणे गरजेचे आहे.

आयुष्यभर स्वत:च स्वत:शी वेळप्रसंगी इतरांशीही वाद घालत राहिलो. 'रात्रंदिन आम्हा, युद्धाचा प्रसंग, अंतर्बाह्य जग आणि मन'च्या धर्तीवर आतबाहेरच्या लढाया करत राहिलो. त्यांत अपरिहार्यपणे अनेकदा घायाळही झालो. स्वत:चेच स्वत:ला 'जिव्हारी' लागेपर्यंत सोलून घेत राहिलो. हे सर्व सुरूच होते; परंतु पुस्तक प्रकाशनानंतर मला 'शेंदूर' फासणाऱ्यांचीही संख्या बऱ्यापैकी वाढली. त्यांनी फासलेला शेंदूर खरवडण्याचे नवीनच काम या पुस्तकाने समोर वाढून ठेवले आहे. म्हणूनच आधी म्हटल्याप्रमाणे सहर्ष स्वीकार करताना 'सावध' राहणेही माझ्यासाठी तेवढेच अपरिहार्य झाले आहे.

कार्यकर्ता म्हणून जे काही पाहिले, अनुभवले, भोगले ते बहुतांश 'जगणं' या पुस्तकात लिहिले आहे. माझ्या जगण्याला ज्या प्रमाणात मिळाले त्याच्या कितीतरी अधिक प्रमाणात माझ्या 'लिहिण्यास' मिळाले. मान, सन्मान, कौतुक, नाव, प्रसिद्धी पुरस्कार. त्यामुळे माझ्यातील 'कार्यकर्ता' चंद्रकांत वानखडेला 'लेखक' चंद्रकांत वानखेडेचा हेवाही वाटतो आहे. त्यामुळे माझ्यातील कार्यकर्त्याला काही प्रश्नही पडले आहेत. युद्धापेक्षा 'युद्धस्य कथा रम्या:' असाच काहीसा प्रकार घडत नाही ना? जगण्यापेक्षाही लिहिण्यालाच जास्त किंमत आहे का? एखादा कार्यकर्ता जगतो आहे. पण आपले जगणे त्याने लिहिले नाही किंवा लिहूच शकत नाही म्हणून समाज त्याची किंमत करणार नाही का? त्याची दखलच घेणार नाही का? असे होऊ नये, एवढीच नम्र विनंती.

**चंद्रकांत वानखडे,**
शिवानी अपार्टमेंट, प्लॉट नं. ९,
सेंट्रल एक्साईज ले-आऊट, टेलिकॉम नगर, खामला,
नागपूर - ४४००२५
मोबा.: ९८२२५८७८४२

ओळख
श्याम धोंड

# एका झंझावाताचे संयत मनोगत


महाराष्ट्राच्या सामाजिक विश्वाला चंद्रकांत वानखडे हे नाव चांगले ठाऊक आहे. मूव्हमेंटचा माणूस म्हणून, संघर्ष वाहिनीचा कार्यकर्ता म्हणून. शेतकरी संघटनेने आणि आंदोलनाने त्यांना व्यापक ओळख दिली. वऱ्हाड , विदर्भ तर त्यांचे माहेरच. त्यामुळे इकडे हा चंद्रकांतराजा ओळखला जातो तो चंदूभाऊ म्हणूनच. एक आक्रमक आणि आघाडीचा शेतकरी नेता म्हणून. गेल्या आठ-दहा वर्षांत एक विचारवंत पत्रकार हीसुद्धा एक सन्मान्य ओळख त्यांना मिळाली आहे. अनेक वर्तमानपत्रांतल्या संपादकीय कार्यकर्तृत्वाने त्यांना ती दिली आहे.

**अश्वत्थाम्याचा मन:संवाद**

चंदूभाऊ एक अश्वत्थामा आहेत. अस्वस्थ आत्मा. वाहिनीत, संघटनेत, आंदोलनात वा पत्रकारितेत, कुठेही असला तरी हा माणूस अस्वस्थचित्त असतो. तो त्याचा मनोधर्म आहे. जाणीवपूर्वक ओढवून घेतलेल्या अनिश्चित आणि अपवादभूत आयुष्याचीच ती त्याला देन आहे. परिणती आहे.

चंदूभाऊंच्या या अशा जीवनाची ओघवती अन् वेगवती, कॅलिडिओस्कोपिक अन् कोलाजसदृश, उसळती अन् कोसळती, ओढलावू अन् वेडलावू कथागाथा म्हणजे 'आपुलाचि वाद आपणासी'. 'एका कार्यकर्त्याचे आत्मकथन' असे त्याला म्हटले असले तरी ते पूर्णांशाने खरे नाही. कारण ते 'एका' कार्यकर्त्याचे किंवा कोण्या 'एका' व्यक्तीचे कथन नाही. तो अनेकांच्या जीवनस्पंदनांचा निनाद आहे. सांगता माणूस किंवा लिहिता हात एक आहे, एवढेच. बाकी, तो आहे एका मोठ्या समुदायाचा आवाज. शब्द चंदूभाऊंचे पण उचंबळ अनेकांचा. आक्रोश अनेकांचा. लढा आणि जय पराजयही अनेकांचाच. चरित्र हा जर एका व्यक्तीचा इतिहास ठरत असेल तर इतिहास हे एका समाजाचे चरित्र असते, या उक्तीचा प्रत्यय देणारे हे बहुमोल लेखन आहे.

'स्वत:बद्दल फारसे बोलू नये, लिहू नये या मूळ स्वभावाच्या विरुद्ध जाऊन मी हे लिहिले आहे. त्यामुळे हे लिहितानाही स्वत:शीच वाद घालावा लागला,' अशी या लेखनामागील लेखकाची भूमिका आहे. असे असले तरी 'तुका म्हणे होय मनासी संवाद' या पूर्वचरणाप्रमाणे लेखकाने इथे विलक्षण उत्कट मन:संवाद साधला आहे. तो 'स्व'चे विकसन करणारा आहे. '१९७० ते २००० या तीन दशकांमध्ये जे काही जगलो, ते जगत असतांना ज्या व्यक्तींशी, चळवळींशी संबंध आला, त्या काळातील घटना-दुर्घटना, मनावर नोंदल्या गेलेल्या क्रिया-प्रतिक्रिया'



हा इथला ऐवज आहे. त्यामुळे एका कार्यकर्त्याचे जगणे, त्याचे सामाजिक संचितच इथे प्रतिबिंबित झाले आहे.

**तीन दशकांचे शक्तिस्रोत : तीन प्रसंग**

लेखकाने जरी हे लेखन १९७० च्या पुढील काळाचे म्हटले असले, तरी ते थेट १९५५-६० पर्यंत मागे गेले आहे. मुळात, लेखकाच्या बालपणातील तीन सूचक प्रसंगांनीच ते आरंभते. त्याच्या मनावरील त्या त्या प्रसंगांचे गोंदणच पुढे त्याला पथदर्शक आणि प्रेरक झाले आहे. पुस्तकाची सुरुवात होते, तीच 'देतं कावं माय उलीसं गाईचं दूध?' या वैराग्यमूर्ती गाडगेबाबांच्या हाकेने. साऱ्या वेटाळाची साफसफाई केल्यावर औषधासाठी फक्त घोटभर दूध मागायला दारी येणारे गाडगेबाबा या आत्मकथनाचे प्रवेशद्वार उघडतात. त्यातून वाचक आत शिरतो, ते परतीचे भान विसरूनच. आधी श्रम करून मगच मोबदला म्हणून काही मागायचे. आणि घ्यायचे तेही गरजेपुरतेच ही गाडगेबाबांची कृतिरूप शिकवण लेखकाच्या मनाचा ठाव घेते. हा या आत्मकथनाचा बीजप्रसंग आहे, पुस्तकाची सात्त्विक सुरुवात करणारा. 'वेल बिगन' म्हणावे एवढी सुप्त शक्ती त्यात एकवटली आहे. दुसरा लंगोटी शाळेतला. तिथे शिकवणारे गुरुजी कट्टर गांधीविरोधक. वर्गावर आले की त्यांचे रोजच्या रोज गांधी चिवडणे सुरू होई. लेखकाच्या बालमनास आदरणीय वाटणाऱ्या महात्म्याबद्दल त्यांचे असे अभद्र बोलणे असह्य होऊन एकदा तो गुरुजींना फाडफाड सुनावून देतो. शिक्षकही मग त्याच्यावर छड्यांचा वर्षाव करतात. लेखकाच्या मनातील खंत मात्र वेगळीच आहे. त्या तिरीमिरीत का होईना पण आपल्याकडून चुकून उच्चारल्या गेलेल्या एका प्रश्नाची. 'तुमच्या सावरकरांनी तरी काय दिवे लावले? डबक्यात उडी मारण्यापलीकडे?' या प्रश्नाची लेखकमनातली बोच आणि सलच त्याची आत्मशोधक आणि विवेकी वृत्ती दाखवून देते. तिसरा प्रसंग नोकरपेशातले वडील आणि शेतकरी काका यांच्यातले व्यवस्थात्मक संबंध तपासणारा आहे. खेड्याहून शहरातल्या भावाकडे दबकत दबकत येणारे शेतकरी काका नि त्याचे कुटुंब आणि तुलनेने थाटात राहणारे शहरचे नोकरदार वडिलांचे कुटुंब. नोकरदार वडिलांच्या कुटुंबाची संपन्नता आणि कास्तकार काकांच्या कुटुंबाची विपन्नता. कायमस्वरूपी कुचंबणा. वडील सरकारी नोकर म्हणून त्यांना महागाई भत्ता, निवृत्ती आणि निवृत्ती वेतन. मात्र शेतीत राबराबून थकलेल्या काकांना कष्टातून निवृत्तीच नाही. म्हणून निवृत्तीवेतनही नाही. तरीही नोकरीतला भाऊ यशस्वी आणि शेतीतला भाऊ अडाणी-आळशी-अपयशी ठरवणारी रूढ व्यवस्था लेखकमनाला प्रश्नांकित करते, चरे पाडते. या अनुभवाच्या ओरखड्यांनी लेखकमन विंधून निघते. वाचकही हलतो. व्यवस्थेला मात्र ते कळूनही वळत नाही. या प्रसंगाच्या अनुबोधाची मुळे लेखकाच्या आयुष्यभर पसरल्याचे पुढे जाणवत राहते. १९७० ते २००० अशी पुढली तीन दशके पुरेल एवढी शक्ती पुरवण्याचे बळ या तीन प्रसंगांनीच तर लेखकाला पुरवले नसेल?

**'एका कार्यकर्त्याचे आत्मकथन'**
**असे त्याला म्हटले असले तरी ते पूर्णांशाने खरे नाही. कारण ते 'एका' कार्यकर्त्याचे किंवा कोण्या 'एका' व्यक्तीचे कथन नाही. तो अनेकांच्या जीवनस्पंदनांचा निनाद आहे. सांगता माणूस किंवा लिहिता हात एक आहे, एवढेच. बाकी, तो आहे एका मोठ्या समुदायाचा आवाज. शब्द चंदूभाऊंचे पण उचंबळ अनेकांचा. आक्रोश अनेकांचा. लढा आणि जय पराजयही अनेकांचाच.**

**क्रांतीचे भूत आणि कलाटणी**

'आपुलाचि वाद'ची कथा खरी आरंभते ती एकनाथ हिरुळकर नावाच्या सर्वोदयीद्वारा, चंदूभाऊंच्या डोक्यात क्रांतीचे भूत भरवण्यातून. त्यातून पुढे घडलेले जयप्रकाशांच्या तरुण शांतिसेनेचे नागपूरचे शिबिर. तिथल्या नवख्या शिबिरार्थ्यांमध्ये क्रांती, सिद्धांत अन् तत्त्वज्ञानाच्या तोफखान्याने चक्रावलेला नवतरणा लेखक चौकसपणे काही शोधू लागतो. ध्येयनिष्ठ समाजकारणासाठी आपले शिक्षण, करिअर, घरदार सोडणारे अशोक बंग, सुधाकर जाधव, किशोर अन् माया देशपांडे असे ध्येयवेडे मित्र त्याला इथे भेटतात. आणि चंद्रकांत वानखडेचे आयुष्य कलाटणी घेते. पुढला दोनशे पानांतला प्रवास मोठा हृद्य आणि रोमांचक आहे. असंख्य प्रसंगांनी गुंफलेला आहे. चंदूभाऊंच्याच शब्दात सुखदुःखांच्या चित्रविचित्र अनुभवांचा तो 'गुंताडा' आहे. मौलिक चिंतनाने भारलेला आहे.

जयप्रकाशजींचे आंदोलन हा चंद्रकांत वानखडेंच्या

सामाजिक कार्याचा आरंभबिंदू झाला आणि मग एकातून दुसरे, दुसऱ्यातून तिसरे अशी आंदोलने, चळवळी आणि घटनाप्रसंगांची साखळीच आकारत गेली. या पुस्तकाच्या पानोपानी आपल्याला ती भेटत राहते. आणि तरीही हे लेखन त्या घडामोडींची जंत्री होत नाही. उलट त्या त्या घटना प्रसंगाच्या निमित्ताने चंदूभाऊंनी चालविलेली स्वतःची 'झाडाझडती' आपल्याला अधिकाधिक अंतर्मुख करीत जाते.

**एस्एम् आणि इतर**

'आपुलाचि वाद'मधील एस्.एम्.जोशींच्या सहवासातील चंदूभाऊंचे दिवस हा एक नितांतसुंदर वाचनानुभव आहे. खरी मोठी माणसे किती उत्तुंग, निर्मळ आणि निरागस असतात याचे हे विरळा उदाहरण आहे. आणीबाणीच्या कृष्णपर्वात इंदिराजींच्याच आज्ञेने 'मुक्त' राहिलेल्या एसेमच्या महाराष्ट्रभर चाललेल्या जागरयात्रेत लेखक सोबत करतो. तेव्हा लेखकाला येणारे एसएमच्या थोरवीचे अनुभव थक्क करून टाकणारे आहेत. आणीबाणीच्या दहशतीला आणि पोलिसी कारवाईला घाबरून एस्.एम्. या एकेकाळच्या दैवताला टाळणारे कार्यकर्ते अन् कुरुंदकरांसारखे विद्वान आणि या वृद्धाच्या वयाची वा कडाक्याच्या थंडीची काडीची पर्वा न करता त्यांना रात्रीबेरात्री वेटिंगरूममधून धक्के मारून फलाटावर फेकणारा रेल्वे निरीक्षक हे सारेच सोयीचे सोयरे आणि आदेशाचे ताबेदार वाटू लागतात. अशावेळी 'परिस्थितीनुसार माणसे बदलतात. त्यांच्या वागण्या-बोलण्यात जमीनअस्मानचा फरक पडतो', हे लेखकाचे म्हणणे पटते. आणि याच पार्श्वभूमीवर गळ्यात चपलांचा हार पडो की शिव्यांचा मार, 'माझा अपमान माझ्याशिवाय कोणीच करू शकत नाही', असे म्हणणारे एस्.एम्. आभाळाच्या उंचीचे वाटू लागतात. विनोबांच्या पवनारात केवळ अध्यात्माच्या जवळ राहूनही राजकारण करणाऱ्या निर्मला देशपांडे एकीकडे; तर केवळ राजकारणात राहूनही आध्यात्मिक राहिलेले एस.एम.जोशी दुसरीकडे हे कसे घडते, हे कोडे लेखकाप्रमाणेच आपल्यालाही उकलत नाही.

संघर्ष वाहिनीचे शिबीर आणि एकूणच कार्य म्हणजे माणसे उभी करण्याचा-मने घडवण्याचाच उद्यम. त्यात ज्येष्ठ-जाणत्या नेत्यांनी केलेल्या मनावरच्या जखमा या आत्मकथनात उघड्या झाल्या आहेत. शिबिरातील खानपान करणारा आचारी कुणाला तरी 'दूर बैठो' म्हणतो, म्हणून तेवढ्यावरून जातीभेदाचा विषय भडकवायला निघालेले आढाव किंवा फर्स्टक्लासची तिकिटे दिली नाहीत म्हणून नाराज होणारे गोरे, लेखकासमोर नेमके कोणाला अन् का मोठे म्हणावे, असे प्रश्न उभे करून जातात. चळवळ चालवणे, शिबीरे भरवणे यांमागील यातायात, कष्ट, नियोजन याची जाणीव या मोठ्यांनाही असू नये याचे लेखकाला वाईट वाटते. म्हणूनच तो म्हणतो, भावनिक प्रश्न मोठे झाले की मूळ प्रश्न बाजूला पडतात. एकीकडे एस.एम, जयप्रकाश आणि दुसरीकडे आढाव, गोरे, शरद जोशी वगैरे अनुभवल्यावर लेखक अगदी सारांशाचे लिहून जातोः ''तत्त्वज्ञान ही केवळ सांगण्याची बाब नाही, ते तुमच्या जगण्या वागण्यातूनच प्रकट व्हावे लागते.''

**नामांतर, मेटीखेडा आणि शेतकरी आंदोलन**

नामांतर आंदोलनात नामांतराच्या बाजूने लढताना एकीकडे सवर्ण तर दुसऱ्या बाजूने दलितांकडूनही होणारी एका पुरोगामी कार्यकर्त्याची कोंडी, त्याची अस्वस्थता, असहायता आणि विकलता स्पष्ट करणारी आहे. या मोठ्या आंदोलनाच्या निमित्ताने प्रकट झालेले खरे चेहरे, संयम सोडणारे 'तथाकथित' नेते या साऱ्यांचे अंतरंग-बहिरंग लेखकाने फार मार्मिकपणे

**पुस्तकाची सुरुवात होते, तीच 'देतं कावं माय उलीसं गाईचं दूध?' या वैराग्यमूर्ती गाडगेबाबांच्या हाकेने. साऱ्या वेटाळाची साफसफाई केल्यावर औषधासाठी फक्त घोटभर दूध मागायला दारी येणारे गाडगेबाबा या आत्मकथनाचे प्रवेशद्वार उघडतात. त्यातून वाचक आत शिरतो, ते परतीचे भान विसरूनच. आधी श्रम करून मगच मोबदला म्हणून काही मागायचे. आणि घ्यायचे तेही गरजेपुरतेच ही गाडगेबाबांची कृतिरूप शिकवण लेखकाच्या मनाचा ठाव घेते. हा या आत्मकथनाचा बीजप्रसंग आहे, पुस्तकाची सात्त्विक सुरुवात करणारा. 'वेल बिगन' म्हणावे एवढी सुप्त शक्ती त्यात एकवटली आहे.**

उलगडले आहे. 'चळवळी, आंदोलने व सामाजिक लढ्यांमुळे विविध प्रकारचे खटले व तुरुंगवास माझ्या पाचवीलाच पुजलेला होता,' असे सांगत लेखकाने आपल्या गजांआडच्या अनुभवांना मनस्वीपणे मांडले आहे. वर्धा, नागपूर, येरवडा अशा तुरुंगवाऱ्या करताना वाट्याला आलेले कच्चे, पक्के आणि खुनांचे कैदी. महात्मा गांधी राहिले त्याच बराकीनजीक जोशी–अभ्यंकर खून खटल्यातील जक्कल चौकडीसोबतच्या कैदेचा अनुभव आणि त्यानिमित्त आलेले लेखकाचे चिंतन वाचनीय आणि मननीय आहे.

मेटीखेड्यातील २० वर्षे हा लेखकाचा सर्वांत कसोटीचा काळ. 'तोंडात गांधी अन् अंगात खादी' असणाऱ्या सुहासच्या शब्दाला भुलून लेखक तिथे गेला पण तो लबाड निघाला. लेखकाने गावच्या शेतमजुरांचे किमान मजुरीसाठी संघटन बांधताच, सर्वोदयी सुहासमधला मालक बिथरला. त्याने आधी दोघांनाही घराबाहेर काढले. पुढे मायाताईंना शाळेच्या मुख्याध्यापक पदावरून घालवले. शाळा मिळविण्यासाठी लेखकाचे संबंध वापरून घेणारा सुहास त्यालाच झटकून मोकळा झाला. लेखक लिहितो, 'मार्क्सवादी भ्रष्ट झाला तर क्रूर बनतो; पण गांधीवादी भ्रष्ट झाला तर ढोंगी बनतो, तो असा.'

बेघर झालेला लेखक स्मशानटेकडीवर राहिला, रोजगार हमीवर राबला. तिथल्या कामगारांच्या योग्य मजुरीसाठी झगडला. पंचक्रोशीतल्या शेतमजुरांची संघटना बांधली. गावची पंचायत निवडणूक महिलांच्या नेतृत्वात लढवून १०० टक्के महिला निवडून आणल्या अन् इतिहास घडविला. मात्र रोहयोच्या कामावरच अल्पभूधारक शेतकरीही राबताना दिसला, तेव्हा चंदूभाऊंनी आपल्या आंदोलनाची फेरतपासणी करून दिशा बदलविली. आणि शेतकरी आंदोलनात उडी घेतली.

१९८०-९० चे दशक शेतकरी संघटनेचे दशक होते. कांदा, कापूस, ऊस उत्पादकांच्या आंदोलनांनी उभा महाराष्ट्र ढवळून निघाला होता. शेतमालाला रास्त भाव मागण्यासाठी लाखो शेतकरी रस्त्यावर उतरले. लेखकही 'राजकीय पुढाऱ्यांना गावबंदी' आंदोलनात सहभागी झाला. शरद जोशींच्या शेतीविषयक मांडणीने प्रभावित होऊन अनेक वर्षे आंबेठाणला राहिला. शेतकरी संघटनेची प्रशिक्षण फळी सांभाळली. मात्र, राजकारणात गेलो तर मला जोड्याने मारा म्हणणाऱ्या शरद जोशींना सत्तेचे डोहाळे लागले आणि त्यांच्या सत्तेपुढील लोटांगणाने कार्यकर्ते चक्रावले. पुढे कधी 'थँक यू डंकेल' म्हणणारा, तर कधी टिकैतांना चकमा देणारा हा नेता स्वार्थापायी उतरणीला लागला आणि एका अभूतपूर्व आंदोलनाची आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांचीही त्याने वाताहत केली. लेखक लिहितो : 'तत्त्वज्ञाने, विचार कामापुरते वापरायचे असतात. काम झाले की फेकून द्यायचे, या आपल्या सूत्राप्रमाणे शरद जोशींनी लाख मोलाची सोन्यासारखी माणसेही वापरून फेकून दिली. एका प्रचंड चळवळीचा विश्वासघात केला.'

'आपुलाचि वाद' हा अशा टप्प्यांचा अन् त्यांतील टक्क्याटोणप्यांचा आत्मसाक्षित्वाने केलेला पंचनामा आहे. एका झंझावाताचे ते अत्यंत संयत सुरातील मनोगत आहे. स्वतःहूनच अंगावर ओढवून घेतलेल्या घटनांचे अन् भोगवट्यांचे ते प्रवचन आहे. यात अवघ्या भूतकाळासह आपले माहेर मागे टाकून चंदूभाऊंशी जन्माचे नाते जोडलेली पण सासरचीही दारे बंद झाल्याने ऐन विवाहाच्या दिवशीची रात्रही घराबाहेरच्या पायरीवर काढणारी मायाताई आहे. झाल्या प्रकाराचा उत्तरायुष्यात उच्चारही न करण्याची तिची शब्दातीत उदारता आणि सोशीकता हृदयस्पर्शी आहे.

विषय प्रतिपादनासाठी कधी उपरोधिक शैली तर कधी दृष्टांत देण्याची शैली वापरणारा लेखक आपले तत्त्व, निष्कर्ष वाचकावर लादत नाही. उलट अनेक घटनांच्या अंती काही कळत नाही, माहीत नाही, कदाचित माझ्या दृष्टीतच काही दोष असावा, अशी नम्रपणाची भूमिका घेतो.

'आपुलाचि वाद' वाचताना वाचकाच्या ओंजळीत पडते ते आयुष्य समजून घ्यायला निघालेल्या आपल्यातल्याच एका सिद्धार्थाचे जीवनदर्शी चिंतन. मनासारखी विचित्र गोष्ट नाही, माणसांचा थांग लागत नाही, रंग बदलण्यासाठी सरडाच बदनाम; पण माणसेही काही कमी रंग बदलत नाहीत, छोट्यामोठ्या प्रसंगात तुम्ही कसे वागता ह्यातूनच तुमची ओळख आकार घेत असते, असे हे आशयगर्भ चिंतन आहे.

जीवनाला आरपार भिडलेल्या, माणसांचा भुकेला असलेल्या एका अजबगजब माणसाचे हे आत्मरंग आहेत. सरल अन् तेवढेच तरलही. दोन डोळ्यांनी समाजाचा आणि अंतर्दृष्टीने स्वतःचा वेध घेणाऱ्या सामान्य माणसाची ही कथा आहे. कधी जात्यात भरडून पीठ होणाऱ्या तर कधी मुशीतून झळाळून उठणाऱ्या. म्हणून तर ती तुमची माझीही कथा आहे.

**श्याम माधव धोंड**

'जिवलग' ५०, अध्यापक ले-आऊट,
अनसूया मंगल कार्यालयामागे, हिंगणा रोड,
नागपूर-४४००३६
मोबा. : ९४२३६८५८६०